आवक क्र./वर्ष ९४०७
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
15 SEP 2014
कार्यासन क्रमांक ४

# अधिसूचना

**महसूल व वन विभाग**,
मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
**मंत्रालय, मुंबई**-४०० ०३२.
**दिनांक** : ११ सप्टेंबर, २०१४

नोंदणी अधिनियम १९०८ (१९०८ चा १६)

**क्रमांक**:-नोंदणी-२०१३/१००१/प्र.क्र.१७१/म-१, नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) (यापुढे ज्याचा निर्देश, "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे), तो महाराष्ट्र शासनाला लागू करताना, त्याच्या कलम ७८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र शासन याद्वारे, शासन अधिसूचना, महसूल विभाग क्र.आरजीएन-१५५८/६७७३१/एन, दि.१७ जुलै, १९६१ याखाली प्रसिध्द् करण्यात आलेल्या फी तक्त्यामध्ये सुधारणा करीत आहे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ७९ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ती सुधारणा, याद्वारे पुढीलप्रमाणे प्रसिध्द् करण्यात येत आहे;

१. अनुच्छेद १० मधील खंड (३) नंतर, पुढीलप्रमाणे खंड (४) समाविष्ट करण्यात येत आहे:-

| | | |
|---|---|---|
| (४) | नोंदणी व मुद्रांक विभागाच्या इ-सर्च किंवा तत्सम ऑनलाईन प्रणालीमधून, दस्ताची स्कॅनइमेज डाऊनलोड करण्यासाठी. | रु.१००/- प्रति दस्त |

२. अनुच्छेद १० खालील स्पष्टीकरणाला "स्पष्टीकरण (१)" असे संबोधण्यात यावे:-

३. अनुच्छेद १० खालील "स्पष्टीकरण (१)" नंतर खालीलप्रमाणे "स्पष्टीकरण (२)" समाविष्ट करण्यात येत आहे:-

"स्पष्टीकरण (२) - "कोणत्याही व्यक्तीने, नोंदणी व मुद्रांक विभागाच्या इ-सर्च किंवा तत्सम कोणत्याही ऑनलाईन शोध सुविधे अंतर्गत, कोणत्याही मिळकतीच्या कोणत्याही कालावधीतील दस्ताच्या शोधासाठी, शोध शुल्काचे प्रदान केल्यानंतर, त्याच व्यक्तीला मूळ प्रदानाचे दिनांकापासून ३० दिवसांचे आत, दुय्यम निबंधक कार्यालयात, त्याच मिळकतीच्या, त्याच कालावधीतील दस्तांचा शोध समक्ष घेण्यासाठी, पुन्हा शोध शुल्क भरण्याची आवश्यकता असणार नाही."

४. अनुच्छेद १० नंतर पुढीलप्रमाणे नवीन अनुच्छेद १०क समाविष्ट करण्यात येईल.
"१०क - फायलिंग आणि इ-फायलिंग"

| | |
|---|---|
| उक्त अधिनियमाचे कलम ८९ब मध्ये विहित केलेल्या नोटीसा नोंदणी व मुद्रांक विभागाच्या इ-फायलिंग किंवा तत्सम प्रणालीद्वारे ऑनलाईन फाईल करण्यासाठी. | रु.१०००/- प्रति नोटीस |

स्पष्टीकरण- उक्त अधिनियमाचे कलम ८९ब मध्ये विहित केलेल दस्त विहित प्राधिकरणाकडून फायलिंग किंवा इ-फायलिंगसाठी प्राप्त झाल्यास फायलिंग फी लागू राहणार नाही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( राजेश नार्वेकर )
उपसचिव

१५८
१५/९/१४

प्रत,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

# NOTIFICATION

**Revenue and Forest Department,**
**Madam Cama Road,**
**Hutatma Rajguru Chowk,**
**Mantralaya, Mumbai-400 032.**
**Dated:- 11th September, 2014.**

Registration Act, 1908 (XVI of 1908)

No. RGN-2013/1001/CR-179/M-1 - In exercise of the powers Conferred by section 78 of the Registration Act, 1908 (XVI of 1908) (hereinafter referred as "the said Act"), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra hereby, amends the table of Fees Published under the Government Notification, Revenue and Forest Department, No.RGN/1558/67331/N, Dated 17th July, 1961 and the same is hereby published as required by section 78 of the said Act, as follows, namely:-

i) In Article X, after the clause (3) following clause (4) shall be inserted namely:-

| | | |
|---|---|---|
| (4) | For down loading, scanning image of document through the 'e-search' or any other online system of Stamps and Registration Department. | Rs.100/- per document |

ii) In article X, the 'Explanation' shall be renumbered as "Explanation -I".

iii) In article X, after 'the Explanation -I, following Explanation-II' shall be inserted namely.-

"**<u>Explanation II</u>**:- Every person, after the payment of search fee for search of document of any property, for any period, under the 'e-search' or any other online system of Stamps and Registration Department, shall not pay search fee for taking physical search of the document of same property for same period, in the Sub Registrar Office, within 30 days from the date of payment. "

iv) After the Article X, the Article XA shall be inserted, namely:-

"XA. <u>Filing and e-filing:</u>

| | |
|---|---|
| For filing or e-filing of the notices prescribed under Section 89B of the said Act, through online 'e-filing' or any other online system of Stamps and Registration Department. | Rs.1000/- per notice |

Explanation: No filing fee shall be liveable in case of documents prescribed under Section 89A of the said Act when received from the prescribed Authority for filing or e-filing."

By order and in the name of Governor of Maharashtra.

**(Rajesh Narvekar )**
**Deputy Secretary**

प्रत,

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक निरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे.